पुण्यात भाजप विरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे तीव्र आंदोलन!

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 28/10/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 250 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com



# ‘इंडिया मेरीटाईम वीक-2025’मध्ये 15 सामंजस्य करार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : सागरी व्यापार आणि उद्योगाशी संबंधित करण्यात आलेल्या सामंजस्य करारांच्या माध्यमातून येत्या काळात महाराष्ट्र देशाच्या सागरी व्यापार आणि उद्योग क्षेत्राचे नेतृत्व करेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नेस्को, गोरेगाव येथे आयोजित इंडिया मेरीटाईम वीक 2025 मध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत 15 विविध सामंजस्य करार करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.**

यावेळी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, बंदरे विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी प्रदीप आणि सामंजस्य करार करण्यात आलेल्या कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.




अनेक कंपन्यांसोबत सागरी इकोसिस्टिम विकासासाठी सामंजस्य करार करण्यात आले असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, सुमारे 56 हजार कोटी रुपयांचे हे करार आहेत. यामुळे महाराष्ट्राला सागरी व्यापार आणि विकासाच्या क्षेत्रात आघाडीवर नेण्यात मदत होईल. बंदर, वाहतूक, उद्योग आणि व्यवसाय या क्षेत्रातील सुविधा जागतिक दर्जाच्या बनतील.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस पुढे म्हणाले, “मुंबईसाठी जल वाहतूक महत्त्वाची आहे. रो-रो सेवा सुरु झाल्यानंतर नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आता गेटवे ऑफ इंडिया ते नवी मुंबई विमानतळ दरम्यान वॉटर टॅक्सी सेवा सुरु केली जाणार आहे, ज्यामुळे प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात वाचेल. तसेच, इलेक्ट्रिक व्हेसल (EV Vessel) ताफा आणला जात आहे, ज्यामुळे जलवाहतूक स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनेल.”

राज्यात जल क्रीडा केंद्रे, जहाज बांधणी उद्योग, आणि ब्ल्यू इकॉनॉमी प्रकल्प विकसित होत आहेत. वाढवणसारखे मोठे बंदर उभारण्यात येत असून, त्यामुळे महाराष्ट्र देशाच्या सागरी क्षेत्रात नेतृत्व करेल, वाढवण बंदर राज्यातील महत्त्वाच्या शहरांशी रस्ते मार्गे जोडले जाणार आहे. त्यामुळे वाढवण बंदराचा फायदा संपूर्ण राज्याच्या विकासासाठी होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला. मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, महाराष्ट्रासाठी हा अभिमानाचा क्षण आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे सागरी क्षेत्रात प्रचंड विकासाच्या संधी निर्माण झाल्या आहेत. जहाज बांधणी धोरण, प्रवासी जलवाहतूक आणि सागरी पर्यटन या क्षेत्रात महाराष्ट्र अग्रगण्य ठरत आहे. लवकरच महाराष्ट्र हा देशाच्या सागरी विकासाचा केंद्रबिंदू बनेल.या करारांमुळे महाराष्ट्रातील सागरी क्षेत्राला जागतिक स्तरावर नवे बळ मिळेल. बंदरविकास, जहाज बांधणी, जहाजदुरुस्ती, आणि सागरी वाहतूक क्षेत्रात गुंतवणुकीचा नवा अध्याय सुरु झाला असल्याचेही मंत्री राणे म्हणाले.

# जैन बोर्डिंग जमीन प्रकरणात रवींद्र धंगेकरांचं थेट मोदींना पत्र!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : पुण्यातील जैन बोर्डिंग हाऊस जमीन व्यवहार प्रकरण गेल्या काही दिवसांपासून चांगलंच चर्चेत आहे. माजी आमदार रवींद्र धंगेकर आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत.दरम्यान, यानंतर आता रवींद्र धंगेकर यांनी थेट पंतप्रधान मोदींना पत्र लिहिलं असून या प्रकरणाची कठोर चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच या प्रकरणातील व्यवहार रद्द न झाल्यास 27 ऑक्टोबरपासून बेमुदत धरणे आंदोलनाला बसण्याचा इशारा रवींद्र धंगेकरांनी दिला आहे.**



धंगेकरांनी म्हंटल आहे कि, “तमाम पुणेकरांना मी एका गोष्टीची माहिती देऊ इच्छितो, आज आपल्या सर्वांच्या वतीने मी जैन बोर्डिंगचा व्यवहार रद्द व्हावा व प्रकरणाची कठोर चौकशी व्हावी, यासाठी देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांना पत्राद्वारे विनंती करत आहे. तसेच 27 ऑक्टोबर 2025 पासून हा व्यवहार रद्द होईपर्यंत मी तमाम पुणेकरांसह जैन बोर्डीग येथे बेमुदत धरणे आंदोलनास बसत आहे.आजपर्यंतच्या गेल्या अठरा दिवसांच्या संपूर्ण संघर्षात माझ्यासह अनेक लोकांनी, अनेक वेळा या गोष्टीचे प्रत्यक्ष पुरावे दिले की, व्यवहारातील सर्वच व्यक्ती व संस्था या मुरलीधर मोहोळ यांच्या संबंधित आहेत. आज मी या पत्र्यामध्ये देखील आपल्या सर्वांच्या माहितीसाठी या संपूर्ण घटनेचा घटनाक्रम देत आहे”, असं रवींद्र धंगेकर यांनी म्हटलं आहे.

“जैन बोर्डिंगचा व्यवहार रद्द होण्याबरोबरच समाजातील मंदिरे व देवस्थानच्या जागा हडप करणाऱ्या टोळीवर कठोर कारवाई व्हावी, यासाठी या प्रकरणाची निपक्ष:पाती चौकशी होणे गरजेचे आहे.

ही मी निपक्ष:पाती चौकशी तेव्हा शक्य आहे, जेव्हा सदर प्रकरणातील मुरलीधर मोहोळ हे आपल्या पदाचा राजीनामा देतील.

कारण त्यांच्या केंद्रीय मंत्रिपदाच्या प्रभावाखालीच हा इतका मोठा गैरव्यवहार घडला आहे. त्यामुळे ही चौकशी होत असताना देखील त्यांनी मंत्रिपदावर राहणे योग्य नाही.

त्यामुळे मी आज मुरलीधर मोहोळ यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याची मागणी करत आहे, असं रवींद्र धंगेकर यांनी म्हटलं.

# अल्पवयीन मुलाला टोळक्याकडून मारहाण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : किरकोळ कारणावरुन एका अल्पवयीन मुलाला चार जणांच्या टोळक्याने लाकडी दांडक्याने आणि लाथाबुक्यांनी मारहाण केली. ही घटना दि. 20 ऑक्टोबर रोजी रात्री नऊच्या सुमारास खेड तालुक्यातील शेलु येथील पडवळ वस्ती परिसरात घडली.शुभम गोडसे (रा. वासुली फाटा, ता. खेड, जि. पुणे), शुभम गाडे, शुभम शिवले आणि विशाल शेळके (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत अल्पवयीन मुलाने शनिवारी (दि. 25) याबाबत महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीचा मावसभाऊ दीपक व वैभव लिंभोरे यांच्या आयशर गाडीच्या भाड्याच्या कारणावरुन शुभम गोडसे याच्याशी वाद झाला होता.

त्यावेळी आरोपी गोडसे याने वैभव यास शिवीगाळ केली. दरम्यान, फिर्यादी हे भांडण सोडविण्यास गेले असता शुभम गाडे याने फिर्यादीच्या कपाळावर लाकडी दांडक्याने मारहाण केली, तर शुभम शिवले याने फिर्यादीला उचलून आपटले. शुभम गोडसे आणि विशाल शेळके यांनी लाथाबुक्यांनी मारहाण करत शिवीगाळ व दमदाटी केली. महाळुंगे एमआयडीसी पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

# कारची दुचाकीला धडक; दोन जण गंभीर जखमी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

भरधाव वेगातील कारने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. या अपघातात दोन भाऊ गंभीर जखमी झाले. ही घटना दि. 21 ऑक्टोबर रोजी सायंकाळी पावणे सहा वाजताच्या सुमारास शिरगाव ते सोमाटणे फाटा रोडवरील ब्रिजजवळ घडली.

कार क्रमांक एमएच-14 केएफ-5271 वरील अज्ञात चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अरुण गंगाधर वाघ (वय 56, रा. अभिमान सोसायटी, शिरगाव) यांनी शनिवारी (दि. 25) याबाबत तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीचा मुलगा सुरज आणि सोमेश्वर हे दोघेजण मिठाई आणण्यासाठी दुचाकी वरुन चालले होते. ते शिरगाव ते सोमाटणे फाटा रोडवरील ब्रिजजवळ आले असता असताना पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या कारने त्यांना पाठीमागून धडक दिली.

या अपघातात सुरज याचा पायाचा घोटा फॅक्चर झाला असून सोमेश्वर याच्या खांद्याचे हाड तुटले आहे. कार चालक अपघातानंतर पळून गेला. तळेगाव दाभाडे पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.




# प्रतिमा काळे यांना शानदार साहित्यरत्न पुरस्काराने सन्मानित



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शबनम न्यूज वृत्तसंस्थेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शानदार या दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

प्रसिद्ध उद्योजक कृष्णकुमार गोयल यांच्या शुभहस्ते तर अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, अखिल भारतीय साहित्य परिषदेचे अध्यक्ष राजन लाखे, भाजपा उपाध्यक्ष सुप्रियाताई चांदगुडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर अंकाचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी सरस्वती माध्यमिक विद्यालय आकुर्डी,पुणे 35 या शाळेच्या शिक्षिका,लेखिका,कवयित्री,निवेदिका,संपादिका "सौ.प्रतिमा काळे" यांना "शानदार साहित्यरत्न पुरस्काराने " सन्मानित करण्यात आले.

यावेळी पिंपरी चिंचवड परिसरातील नामवंत मंडळी उपस्थित होते.

त्यात राजकीय,सामाजिक,साहित्यिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.शानदार या दिवाळी अंकाचा प्रकाशन सोहळा व पुरस्कार सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न झाला.

# " M.P.S.C. Boys" मराठी चित्रपटाचे पहिलं पोस्टर प्रदर्शित

## महाराष्ट्राच्या पोरांच्या शिक्षणाची कथा – आता मोठ्या पडद्यावर...!

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

महाराष्ट्रातील तरुणांच्या शिक्षणातील संघर्ष, स्वप्नं आणि वास्तवाचं भावविश्व उलगडणाऱ्या "M.P.S.C. Boys" या आगामी मराठी चित्रपटाचं पहिलं पोस्टर नुकतंच प्रदर्शित करण्यात आलं आहे.

Black Horse Motion Pictures आणि Uday Entertainment यांच्या संयुक्त निर्मितीतील हा चित्रपट दिग्दर्शक अविनाश किसनराव कांबीकर यांचा नवा सिनेमॅटिक प्रयोग असून, शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांच्या ध्यासात जगणाऱ्या तरुणाईच्या आयुष्याचा प्रवास या चित्रपटातून उलगडला जाणार आहे.


चित्रपटाच्या या पोस्टरमध्ये पुण्याच्या शनिवारवाड्याच्या पार्श्वभूमीत अभ्यासात, चर्चेत आणि स्वप्नात गुंतलेले विद्यार्थी दिसतात. तर बाजूला विविध क्लासेस आणी ॲकडमीच्या जाहीरात असलेले बॅनर दिसत आहेत, नोटबुकच्या पानांसारखी पार्श्वभूमी आणि हस्ताक्षरात लिहिलेलं शीर्षक "M.P.S.C. Boys" विद्यार्थ्यांच्या जगाशी जवळीक निर्माण करत जिवंतपणा आणतं.

"महाराष्ट्राच्या पोरांची शिक्षणाची कथा — आता मोठ्या पडद्यावर...!" या टॅगलाइनने चित्रपटाचा भावनिक केंद्रबिंदू प्रभावीपणे अधोरेखित केला आहे.

दिग्दर्शक अविनाश कांबीकर म्हणाले, "या चित्रपटातून मी त्या प्रत्येक तरुणाचा संघर्ष आणि आत्मविश्वास दाखवण्याचा प्रयत्न केला आहे, जो शिक्षणाच्या मैदानात आपलं भविष्य घडवण्यासाठी दिवस-रात्र मेहनत घेतो. 'M.P.S.C. Boys' ही केवळ एक कथा नाही, तर महाराष्ट्रातील पोरांची प्रेरणादायी सफर आहे."

अविनाश कांबीकर यांनी यापूर्वी दिग्दर्शित केलेल्या "सुलतान" या लघुपटाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले असून, त्या चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनात वेगळी छाप पाडली होती. संवेदनशील आणि वास्तववादी दृष्टिकोन असलेले हे दिग्दर्शक आता "M.P.S.C. Boys" च्या माध्यमातून तरुणाईच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयाला हात घालत आहेत. लवकरच या चित्रपटाचे शूटिंग सुरु होणार असून, 2027 च्या दरम्यान हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

विद्यार्थ्यांच्या संघर्षमय प्रवासाची वास्तववादी झलक आणि प्रेरणादायी आशय या दोहोंचं उत्तम मिश्रण या चित्रपटातून प्रेक्षकांना पाहायला मिळेल.




# दिवाळीत महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून स्वच्छतेसाठी विशेष मोहीम

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने दिवाळी काळात कचरा संकलनासाठी विशेष नियोजन करण्यात आले होते. महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी 20 ऑक्टोबर ते 23 ऑक्टोबर 2025 या चार दिवसांच्या काळात तब्बल 5 हजार 658 टन कचरा संकलित केला आहे.

दिवाळीच्या काळात घराघरात करण्यात येणारी साफसफाई, बाजारपेठांतील गर्दी, फटाक्यांचा कचरा आणि सजावटीसाठी वापरले जाणारे साहित्य यामुळे शहरातील कचऱ्याचे प्रमाण नेहमीपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन आरोग्य विभागाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली कचरा संकलनाचे विशेष नियोजन केले होते.

कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी महापालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत 32 प्रभागांमध्ये स्वच्छता कर्मचारी,



घंटागाड्या आणि वाहने 24 तास कार्यरत होती. या काळात दररोज सरासरी 1 हजार 400 टनांहून अधिक कचरा संकलित करण्यात आला. फटाक्यांच्या अवशेषांचा स्वतंत्रपणे कचरा म्हणून निपटारा करण्यात आला. तसेच ओला आणि सुका कचरा वेगळा करण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

घरगुती साफसफाईमधून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे संकलन करण्यासाठी घंटागाड्यांची संख्या वाढविण्यात आली होती. नागरिकांनी घरगुती कचरा ओला व सुका असा वेगळा करून द्यावा, तसेच वापरात नसलेल्या परंतु सुस्थितीत असलेल्या वस्तू महापालिकेच्या आर.आर.आर. केंद्रात जमा कराव्यात, असे आवाहन आरोग्य विभागाकडून नागरिकांना करण्यात आले होते. त्यास देखील नागरिकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला.

### विशेष साप्ताहिक स्वच्छता मोहिमेचे नियोजन

दिवाळीनंतरही शहरात स्वच्छतेचा संकल्प कायम ठेवण्यासाठी आरोग्य विभागाने विशेष साप्ताहिक स्वच्छता मोहीम सुरु केली आहे. सार्वजनिक ठिकाणे, मंदिर परिसर, बाजारपेठा आणि फटाक्यांच्या विक्री झालेल्या भागांमध्ये अतिरिक्त स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी देखील या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पुण्यात भाजप विरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे तीव्र आंदोलन!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : गेल्या काही दिवसांपासून जैन बोर्डींग प्रकरण चर्चेचा विषय ठरत आहे. या प्रकरणात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर देखील आरोप होत आहेत. याच पार्श्वभूमीवर पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून तीव्र आंदोलन करण्यात आले.

यामध्ये "मामाच्या गावाला जाऊया, जैन मंदिर खाऊया," अशा घोषणा देत भाजप विरोधात मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी मुरलीधर मोहोळ यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी देखील आंदोलनकर्त्यांच्या वतीने




करण्यात आली.शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सदर आंदोलन पार पडले. यावेळी बोलताना प्रशांत जगताप म्हणाले, महाराष्ट्राचे धर्मादाय आयुक्त हे मुख्यमंत्र्यांचे सख्खे मामेभाऊ आहेत.

या आयुक्तांना हाताशी धरून अवघ्या काही दिवसात हा भ्रष्ट व्यवहार पूर्ण करण्यात आला.

म्हणूनच मामाच्या गावाला जाऊया जैन मंदिर खाऊया, या माथाळ्याखाली हे आंदोलन करण्यात आले.सदर आंदोलन धर्मदाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे येथे करण्यात आले असून या आंदोलनाच्या माध्यमातून सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह ,असंख्य जैन बांधवांनी, पुणेकरांनी भाजपच्या भ्रष्ट कारभाराचा निषेध व्यक्त केला.

# महानगरपालिका जनसंवाद सभेत नागरिकांच्या 68 तक्रार वजा सूचना प्राप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - महापालिकेच्या वतीने पार पडलेल्या जनसंवाद सभेत एकूण 68 तक्रार वजा सूचना प्राप्त झाल्या आहे.

आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या आदेशानुसार पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक आणि महापालिका प्रशासन यांच्यात सुसंवाद राखण्यासाठी महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांत महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. त्यानुषंगाने आज ऑक्टोबर महिन्याच्या चौथ्या सोमवारी अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या आठ क्षेत्रीय



कार्यालयात आज जनसंवाद सभा पार पडली. यावेळी नेमून दिलेल्या समन्वय अधिकाऱ्यांनी जनसंवाद सभेचे अध्यक्षपद भूषविले. काल पार पडलेल्या जनसंवाद सभेत अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयात अनुक्रमे 5, 13, 3, 10, 6, 10, 2 आणि 19 अशा एकूण 68 तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

यावेळी नागरिकांनी शहरातील वाहतूक कोंडी, अरुंद रस्ते, अवैध पद्धतीने लावलेले बॅनर, लहान मुलांसाठी खेळांचे मैदान, मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त, राष्ट्रीय महामार्गावर सणासुदीच्या काळात होणारी वाहतूक कोंडी, प्रत्येक प्रभागातील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती सार्वजनिक स्वच्छतागृहांची स्वच्छताआदी तक्रार वजा सूचना जनसंवाद सभेत नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या. या उपक्रमामुळे नागरिकांच्या सहभागातून प्रशासन अधिक पारदर्शक व जबाबदार होईल, तसेच शहरातील नागरी सुविधांच्या उन्नतीस गती मिळेल, असा विश्वास महापालिका प्रशासनाने व्यक्त केला.

# महानगरपालिकेत अधिकाऱ्यांचे खाते बदल व अतिरिक्त कार्यभार वाटप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशानुसार विविध विभागांतील अधिकाऱ्यांचे खाते बदल आणि अतिरिक्त कार्यभाराची जबाबदारी त्यांचेवर सोपविण्यात आली आहे.

महापालिकेमध्ये निवडणूक व जनगणना आणि कर आकारणी व संकलन विभाग अशा दोन विभागाचे कार्यभार सांभाळणारे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांची बदली नागपूर येथे बदली झाली. यामुळे रिक्त झालेल्या कर आकारणी व संकलन विभागाचा अतिरिक्त कार्यभार क्रीडा




विभागाचे उप आयुक्त पंकज पाटील यांच्याकडे (क्रीडा विभागासह) सोपविण्यात आला आहे.तर आरोग्य विभाग आणि स्वच्छ भारत अभियान विभागाचा कार्यभार पाहणारे उप आयुक्त सचिन पवार यांना निवडणूक व जनगणना विभागाचा कार्यभार देण्यात आला आहे.

दरम्यान, नागरी सुविधा केंद्राचे उप आयुक्त प्रदीप ठेंगल यांच्याकडे आरोग्य विभाग आणि स्वच्छ भारत अभियानचा (नागरी सुविधा केंद्रासह ) अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

महानगरपालिकेच्या प्रशासकीय कार्यात गती, समन्वय आणि कार्यक्षमतेसाठी करण्यात आलेल्या या फेरबदलामुळे विविध विभागांमधील कामकाज अधिक प्रभावीपणे पार पाडण्यास मदत होणार आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579